जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८१४ दिनांक - १८/११/२०२३**

पी.सी.बी.गुन्हे शाखा पुणे शहर

**वानवडी पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या, अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

पुणे पोलीस आयुक्तालयातील वानवडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **मतीन हकीम सैय्यद,वय-३४ वर्षे,रा.स.नं.१०८/१०९,रामनगर,हडपसर,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह वानवडी, हडपसर पोलीस स्टेशनच्या हद्दीत कोयता, गावठी पिस्टल, सुरा, लाकडी बांबु या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह घातक शस्त्राने गंभीर दुखापत करणे, घातक शस्त्राने साधी दुखापत करणे, दंगा, बेकायदेशीर अग्नी शस्त्र व हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षांमध्ये त्याचेविरूध्द ०८ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **श्री.रितेश कुमार,पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपूर येथे ०१ वर्षाकरीता स्थान बध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,वानवडी पोलीस स्टेशन,पुणे,श्री.भाऊसाहेब पठारे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,वानवडी पोलीस स्टेशन, पुणे,श्री.संजय पतंगे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे,श्री.ए.टी.खोबरे आणि त्यांचे अधिपत्याखालील पोलिस अधिकारी व पोलिस अमंलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी चालु वर्षामध्ये दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ५८ कारवाया केल्या आहेत.** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.